तातडीचे

कायम विना अनुदान

परवानगी वर्ष [२००९-१०]

२९७ ९१-१६

जा.क्र.माध्य.३/१२/नमाशा/पुवि/२००९-१०/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय,
दिनांक : / /१०

प्रति,

सचिव
राजगड ज्ञानपिठ भोर,
जिल्हा पुणे.

27 AUG 2009

राजगड ज्ञानपीठ भोर जि.पुणे
आवक नं. १२६/३/१०/२००९
जावक नं. —

विषय :- २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत . . .

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-नमाशा/२००९/(१५२/२००९)/माशि-१, दिनांक-२७ जुलै, २००९.

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | राजगड ज्ञानपिठ भोर जिल्हा पुणे. | भोर, ता-भोर, जिल्हा पुणे. | आठवी | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१. आपल्या संस्थेस वर नमुद केलेल्या ठिकाणी नविन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
३. शासनाच्या पुर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
४. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु.१००/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करावे.
५. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
६. "कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेली शाळा असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.
७. सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने/शाळेने संबंधित अधिका-यांशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना "कायम विनाअनुदानित शाळा अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.
८. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० अगर केवळ मुंबई सार्वजनीक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी
९. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
१०. सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
११. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबीत नाही.
१२. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही. सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १२ विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.
१३. शासन निर्णय, दि.१९ ऑक्टोबर, २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्यांच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील, अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत असे गृहित धरले जाईल.
१४. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक-एसएसएन २१०३/(५८/०३)/माशि-२, दि.२७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

वरील प्रतीवर विभाग उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

(बी.बी. आरोटे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे.
२. आपण संबंधित संस्थेची अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

प्रत ३. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर
४. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना सविनय सादर

Sandeep/nmashal.1

Scanned with CamScanner